सातवा वेतन आयोग
विमुक्त जाती भटक्या जमाती विशेष मागासवर्ग व उसतोड कामगारांच्या मुलांसाठीच्या प्राथमिक व माध्यमिक तसेच विद्यानिकेतनमधील प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळांमधील पुर्णवेळ शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सुधारीत वेतनश्रेणी लागू करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
इतर मागास वर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग
शासन निर्णय क्रमांकः विभशा-२०१९/प्र.क्र.२४८/विजाभज-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२.
तारीख: २९ जुलै, २०१९

वाचा:- १. शासन निर्णय वित्त विभाग क्र.वेपुर-२०१८/प्र.क्र.४४/सेवा-९ दि.०१.०१.२०१९
२. शासन अधिसूचना वित्त विभाग क्र.वेपुर-२०१९/प्र.क्र.०१/सेवा-९ दि.३०.०१.२०१९
३. शासन परीपत्रक वित्त विभाग क्र.वेपुर-२०१९/प्र.क्र.०९/सेवा-९ दि.२०.०२.२०१९
४. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र.९१८/दि.१६.०३.२०१९

प्रस्तावना:-

सातव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीवरील केंद्र शासनाचे निर्णय विचारात घेऊन राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याकरीता श्री. के. पी. बक्षी, सेवानिवृत्त अपर मुख्य सचिव, यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ ची स्थापना करण्यात आली होती. सदर समितीच्या शिफारशी शासनाने काही फेरफारासह स्वीकृत करण्याचा निर्णय संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये घेतला आहे. त्या अनुषंगाने इतर राज्य शासकीय कर्मचाऱ्यांबरोबर अनुदानित शाळांतील पूर्णवेळ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून सुधारीत वेतन संरचना लागू करण्याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१८ च्या संदर्भ क्रमांक २ अन्वये अधिसूचित केले आहेत. तसेच संदर्भ क्रमांक ३ च्या परिपत्रकानुसार प्रारंभिक वेतननिश्चितीबाबत व थकबाकी अदा करण्यासंदर्भात सविस्तर कार्यपध्दती विहित करण्यात आलेली आहे. वाचा येथील क्र. ०४ नुसार संचालनालयाकडुन इतर मागास वर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण या विभागातील शासन मान्यताप्राप्त व अनुदानित आश्रमशाळा/ निवासीशाळा/ उसतोड कामगारांच्या मुलांकरीता असलेल्या आश्रमशाळा / विद्यानिकेतन या प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळांमधील मान्यताप्राप्त शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना देय होणारी सुधारित वेतन संरचना लागू करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदर प्राप्त प्रस्तावानुसार या विभागाच्या प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळांतील कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार सुधारीत वेतन संरचना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

शासन आता असे निर्देश देत आहे की, संदर्भ क्रमांक २ अन्वये अधिसूचित केलेल्या महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम, २०१९ मधील सुधारीत वेतन संरचना व वेतनश्चितीचे नियम तसेच संदर्भ क्रमांक ३ अन्वये वेतन निश्चिती व थकबाकी अदा करण्यासंदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या सूचना सोबतच्या जोडपत्रातील इतर मागास वर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग

कल्याण या विभागातील शासन मान्यताप्राप्त व अनुदानित आश्रमशाळा/ निवासीशाळा/ उसतोड कामगारांच्या मुलांकरीता असलेल्या आश्रमशाळा/ विद्यानिकेतन यातील प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळांमधील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना (सुधारित वेतन संरचना) योग्य त्या फेरफारासह (शासन निर्णयाच्या सोबतच्या जोडपत्राप्रमाणे) लागू करण्यात येत आहेत.

२. सुधारित वेतन संरचनेत वेतननिश्चिती करण्यासाठी आवश्यक तो विकल्प हे आदेश निर्गमित झाल्याच्या २ महिन्यांच्या आत देण्यात यावा. एकदा दिलेला विकल्प अंतीम राहील.

३. या आदेशान्वये लागू करण्यात आलेल्या सुधारित वेतन संरचनेमुळे होणारा अतिरिक्त खर्च शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे भत्ते यावरील खर्च ज्या लेखाशिर्षाखाली खर्ची घालण्यात येतो त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची घालण्यात यावा व त्या खालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.२१४/२०१९/सेवा-०९ दिनांक १३.०६.२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०७२९१५२७२०४९२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=VJNT OBCS SBC Welfare Dept., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2019.07.29 16:42:33 +05'30'

(भा. र. गावित)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव.
३. मा. मंत्री, विजाभज इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव.
४. मा. राज्यमंत्री, विजाभज इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव.
५. मा. मुख्य सचिव यांचे वरीष्ठ स्वीय सहायक.
६. मा. अप्पर मुख्य सचिव वित्त विभाग यांचे स्वीय सहायक.
७. मा. अप्पर मुख्य सचिव नियोजन विभाग यांचे स्वीय सहायक.
८. मा. प्रधान सचिव विजाभज इमाव व विमाप्र कल्याण विभाग.
९. महालेखापाल-१ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र मुंबई
१०. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र मुंबई.
११. महालेखापाल-२ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र मुंबई
१२. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र मुंबई.
१३. संचालक, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४. प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग सर्व
१५. सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण सर्व
१६. जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद सर्व
१७. अध्यक्ष / सचिव विजाभज, विमाप्र, उसतोड कामगरांच्या मुलांसाठीच्या आश्रमशाळा व विद्यानिकेतन व इतर आश्रमशाळा
१८. मुख्याध्यापक प्राथमिक / माध्यमिक आश्रमशाळा महाराष्ट्र राज्य
१९. निवड नस्ती (विजाभज-२)

शासन निर्णय इतर मागास वर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग क्र.विभशा-२०१९/प्रक्र.२४८/विजाभज-२ दि.२९.०७.२०१९ सोबतचे जोडपत्र...

माध्यमिक आश्रमशाळेतील शिक्षकेतर कर्मचारी

अ.क्र.	पदनाम	विद्यमान वेतनसंरचना		सुधारीत वेतन मॅट्रीक्समधील वेतन
प्राथमिक आश्रमशाळा विभाग				
१	मुख्याध्यापक प्राथमिक आश्रमशाळा (बी.ए./ बी.कॉम./ बी.एस्सी. अधिक बी. एड./ बी.टी. डी. एड.)	९३००-३४८००	४३००	S-१४ ३८६००-१२२८००
		९३००-३४८००	४४०० (वरीष्ठ श्रेणी)	S-१५ ४१८००-१३२३००
		९३००-३४८००	४८०० (निवडश्रेणी २० टक्के पदांसाठी)	S-१७ ४७६००-१५११००
२	प्रशिक्षित (प्राथमिक शिक्षक) बी.एड./डी.एड. सह पदवी	५२००-२०२००	२८००	S-१० २९२००-९२३००
		९३००-३४८००	४२०० (वरीष्ठ श्रेणी)	S-१३ ३५४००-११२४००
		९३००-३४८००	४३०० (निवडश्रेणी २० टक्के पदांसाठी)	S-१४ ३८६००-१२२८००
३	अप्रशिक्षित प्राथमिक शिक्षक एस.एस.सी.	५२००-२०२००	२०००	S-७ २१७००-६९१००
माध्यमिक आश्रमशाळा विभाग				
४	मुख्याध्यापक/प्राचार्य (माध्यमिक आश्रमशाळा)	९३००-३४८००	४८००	S-१७ ४७६००-१५११००
		१५६००-३९१००	५४०० (वरीष्ठ श्रेणी)	S-२० ५६१००-१७७५००
५	माध्यमिक शिक्षक प्रशिक्षित बी.टी./ बी.एड. सह	९३००-३४८००	४३००	S-१४ ३८६००-१२२८००
		९३००-३४८००	४४०० (वरीष्ठ श्रेणी)	S-१५ ४१८००-१३२३००
		९३००-३४८००	४८०० (निवडश्रेणी २० टक्के पदांसाठी)	S-१७ ४७६००-१५११००
६	अप्रशिक्षित पदवीधर शिक्षक	५२००-२०२००	२८००	S-१० २९२००-९२३००

अ.क्र.	पदनाम	विद्यमान वेतनसंरचना		सुधारीत वेतन मॅट्रीक्समधील वेतन
		वेतन बँड	ग्रेड वेतन	
७	वरीष्ठ लिपीक	५२००-२०२००	२४००	S-८ २५५००-८११००
८	कनिष्ठ लिपीक	५२००-२०२००	१९००	S-६ १९९००-६३२००
९	ग्रंथपाल (पदवीधर व ग्रंथशास्त्रातील पदवी अथवा पदविका) व दि.२७.१२.१९७९ पुर्वीची नियुक्ती	५२००-२०२००	२८००	S-१० २९२००-९२३००
१०	ग्रंथपाल (मॅट्रीक व ग्रंथपालाचे प्रशिक्षण प्रमाणपत्र)	५२००-२०२००	२४००	S-८ २५५००-८११००
११	प्रयोगशाळा सहायक (मॅट्रीक पदार्थविज्ञान,रसायन विषयासह)	५२००-२०२००	२०००	**S-७ २१७००-६९१००**
१२	प्रयोगशाळा परिचर (पदार्थ विज्ञान, रसायनशास्त्र हे विषय घेऊन एस. एस. सी.साठी पूर्व वर्गापर्यंत शिकलेले)	५२००-२०२००	१९००	S-६ १९९००-६३२००
१३	इतर प्रयोगशाळा परीचर	४४४०-७४४०	१३००	**S-१ १५०००-४७६००**
१४	नाईक	**४४४०-७४४०**	**१६००**	**S-३ १६६००-५२४००**
१५	शिपाई	**४४४०-७४४०**	**१३००**	**S-१ १५०००-४७६००**
१६	माळी	**५२००-२०२००**	**१८००**	**S-५ १८०००-५६९००**

आश्रमशाळा वसतिगृह विभाग

१७	**(अ)** वसतिगृह अधिक्षक (आश्रमशाळा) प्रशिक्षित	५२००-२०२००	२८००	S-१० २९२००-९२३००
	(ब) अप्रशिक्षित वसतिगृह अधिक्षक	५२००-२०२००	**२४००**	S-८ २५५००-८११००
१८	स्वयंपाकी	**४४४०-७४४०**	**१६००**	**S-३ १६६००-५२४००**
१९	कामाठी	**४४४०-७४४०**	**१३००**	**S-१ १५०००-४७६००**
२०	सह स्वयंपाकी	**४४४०-७४४०**	**१३००**	**S-१ १५०००-४७६००**

टिपः- विद्यानिकेतनसाठी मंजुर असलेल्या पदांसाठी माध्यमिक विभागातील आणि वसतिगृह विभागातील समकक्ष पदाप्रमाणे सुधारीत वेतनश्रेणी राहतील.